करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

परखड अग्रलेख | वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे | करमाळेकरांची खास ओळख

संस्थापक संपादक : डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे,
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

वर्ष 31 वे

साप्ताहिक कमलाभवानी
संदेश
|www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com|

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे |अंक क्र.११२| पाने-१२ | दि.२७/१/२०२३ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ३ रू.

आपल्या व्यवसायाची ऑनलाईन जाहिरात करण्यासाठी उपयुक्त ठिकाण
साप्ताहिक संदेश ऑनलाईन न्यूज पोर्टल
संपर्क
9822058106
संदेश
संदेश
ऑनलाईन न्यूज पोर्टल
www.saptahiksandesh.com
9822058106

॥ श्री कोटलिंग प्रसन्न ॥
मजबुती आणि विश्वास
एकाच ठिकाणी..!
शिवम
स्टिल अ‍ॅन्ड सिमेंट एजन्सी
टी.एम.टी.बार चे अधिकृत विक्रेते
प्रोप्रा : अमोल बबन ढवळे
(9850125561, 9423339966)
खडी, क्रॅशसॅण्ड योग्य दरात मिळेल
आयकॉन स्टीलचे अधिकृत विक्रेते
पत्ता : नगर-सोलापूर बायपास रोड, करमाळा.
Authorized Dealer
Authorized Dealer
Authorized Dealer
Authorized Dealer
ICON STEEL

तालुक्यातील चार साखर कारखान्यामार्फत ९ लाख मे.टन गाळप

बाहेरी कारखान्याकडून तालुक्यातील कारखान्यापेक्षा जास्त गाळप

करमाळा : तालुक्यातील चार साखर कारखान्याकडून २६ जानेवारी पर्यंत ९ लाख २ हजार १८२ मेट्रीक टन ऊसाचे गाळप झाले आहे. विशेषत: तालुक्यातील चार साखर कारखान्यापेक्षा बाहेरील कारखान्यांनी जवळपास १२ लाख मेट्रीक टन तालुक्यातील ऊसाचे गाळप केले आहे.

करमाळा तालुक्यातील चारही साखर कारखाने सुरू झाले आहेत. विशेषत: आदिनाथ कारखाना हा फारच उशीरा म्हणजे जानेवारी २०२३ मध्ये सुरू झाला आहे. आदिनाथ कारखान्यात आत्तापर्यंत ३० हजार मे.टन ऊसाचे गाळप झाले आहे. मकाई साखर कारखान्यात ९५ दिवस ऊसाचे गाळप होऊन आत्तापर्यंत १ लाख ४१ हजार ७५५ मे.टन ऊसाचे गाळप झाले आहे. सर्वात जास्त गाळप कमलाभवानी साखर कारखान्यात ७८ दिवसात ४ लाख २५ हजार ३५७ मे.टन ऊसाचे गाळप झाले आहे तर भैरवनाथ शुगर विहाळ येथे ८९ दिवसात ३०५०७० मेट्रीक टन ऊसाचे गाळप झाले आहे. तालुक्यातील ऊस बाहेरील साखर कारखान्यांनी मोठ्या प्रमाणात गाळप केला आहे. अंबालिका, बारामती ॲग्रो, श्रीराम हाळगाव, साई कारखाना हिरडगाव, विठ्ठल शुगर्स म्हैसगाव, विठ्ठलराव शिंदे निमगाव तसेच पंढरपूर, इंदापूर आदी कारखान्यांनी तालुक्यातील जवळपास १२ लाख मेट्रीक टन ऊसाचे गाळप केले आहे.

करमाळा तालुक्यातील चार कारखान्याचे गाळप ९ लाख मेट्रीक टन तर विठ्ठलराव शिंदे माढा या एकट्या कारखान्याचे १२ लाख ३५ हजार २१५ मेट्रीक टन ऊसाचे गाळप केले आहे. विशेष म्हणजे या कारखान्याचा साखर उताराही ९.७६ असा आहे. तालुक्यातील साखर कारखान्याचा सरसरी साखर उतारा पावणेआठ पासून पावणेनऊ एवढाच आहे. गेल्या दिड महिन्यापासून तालुक्यातील कारखान्यांनी ऊस उत्पादकाची बिले न दिल्याने ऊस देण्यावर परिणाम झाला आहे. नुकतेच काही कारखान्यांनी काटापेमेंट सुरू केले आहे.कारखान्याकडून बिले न मिळाल्याने शेतकरी अडचणीत आले असून नाराज व निराश आहेत.

सस्नेह निमंत्रण

विवाहस्थळ
गोडसे फार्म
कर्जत रोड
पाण्याच्या टाकीजवळ
करमाळा

भोजन वेळ : दुपारी १ ते आगमनापर्यंत
आहेर व भेटवस्तू स्विकारले जाणार नाहीत.

फर्म
- गोडसे ट्रान्सपोर्ट
- माही डेकोरेशन
- आर.ए.न्युट्रीशन
- ओंकार फ्लावर्स करमाळा.

टीप
सर्वांना निमंत्रण पत्रिका दिलेल्या आहेतच. नजरचुकीने कोणास निमंत्रण पत्रिका मिळाली नसल्यास हेच निमंत्रण समजून शुभकार्यास अगत्य येण्याचे करावे, ही नम्र विनंती

॥ श्री गजानन प्रसन्न ॥ ॥ श्री कमलादेवी प्रसन्न ॥ ॥ श्री कुलदैवत प्रसन्न ॥
श्रीमान स.न.वि.वि. आमचे येथे श्रीहरी कृपेकरून...
चि.मंगेश
स्व.बाबा तुकाराम गोडसे यांचे नातू व श्री.मनोज बाबा गोडसे रा.करमाळा यांचे तृतीय चिरंजीव
चि.सौ.कां.वैष्णवी
स्व.राजाराम बाबु गोळे यांची नात व स्व.जोतिराम राजाराम गोळे रा.करमाळा यांची द्वितीय सुकन्या
यांचा
卐 शुभविवाह 卐
मंगळवार दि.३१/१/२०२३ रोजी सायं.६वा. १३ मि.
या शुभमुहूर्तावर संपन्न होणार आहे.
तरी वधू-वरास शुभाशिर्वाद देण्यासाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

आपले नम्र
श्री.मनोज बाबा गोडसे (माजी सदस्य, कृषी उत्पन्न बाजार समिती) श्री.दत्तात्रय बाबा गोडसे, उमेश मनोज गोडसे,
महेश मनोज गोडसे, स्वप्नील दत्तात्रय गोडसे, प्रशांत दत्तात्रय गोडसे व समस्त गोडसे परिवार, करमाळा.

सोयीचा गैरफायदा घेतला की सर्वांचीच गैरसोय होते.

संपादकीय.............................!

शक्तीस्थान - कुर्मग्राम

उजनी जलाशयात करमाळा तालुक्यातील जवळपास २४ गावांना जलसमाधी मिळाली. वास्तविक पाहता या २४ गावांचे पाहिजे तसे पुनर्वसन झाले नाही. काही वर्षे ज्या ग्रामस्थांचे गाव पाण्यात गेले त्यांना खूप यातना सहन कराव्या लागल्या. घरापासून रस्त्यापर्यंत आणि पिण्याच्या पाण्यापासून वीजेच्या दिव्या पर्यंत अशा प्राथमिक गरजासाठी खूप संघर्ष करावा लागला. एवढेच काय अनेकांना त्यात आपले स्वत:चे जीवनही गमवावे लागले आहे. असे असलेतरी उजनी धरण तयार झाले आणि धरणापाठोपाठ काठावरील गावे आणि शेतकरी समृध्द झाले. उजनीने अनेक गावे पर्यटन स्थळ म्हणून निर्माण केलेले आहेत.

चिखलठाण शेजारीच पश्चिमेकडे असलेले कुर्मग्राम तथा कुगाव हेही एक अतिउत्तम पर्यटन स्थळ आहे. या गावाला केवळ पर्यटन एवढाच वारसा नाहीतर हनुमान जन्मभुमी म्हणून या गावाची ओळख आहे. याबाबत भीमामहात्म्य या पौराणिक ग्रंथात ३३ व्या अध्ययात हनुमान जन्माची कथा मांडलेली आहे. कुगाव येथे हनुमान मंदिर असून प्रतिवर्षी येथे हनुमान जयंतीच्या निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताह पासून विविध कार्यक्रम होतात. याबाबत आणखीन एक महत्वाची माहिती म्हणजे सन १८६८ साली बॉम्बे प्रांताचे गर्व्हनर सर विल्यम यांनी कुगाव येथील मारूती देवस्थान साठी साडेतेवीस एकर जमीन दिलेली आहे.

केवळ हनुमान जन्मभुमी म्हणूनच या गावाचे महत्व नाहीतर येथे उत्तमप्रकारे पर्यटन स्थळ आहे. कुगाव या गावाच्या तीनही बाजूने उजनीच्या पाण्याच परिसर असून या पाण्यावर चालणाऱ्या होडी, मच्छिमार तसेच येणारे पक्षी, लॉंचेस याबाबी अनुभवण्यासारख्या आहेत. या परिसरात पूर्वी शासनाने चार जलमार्ग मंजूर केले होते. परंतू काळाच्या ओघात ते जलमार्ग होऊ शकले नाहीत. सैराट या चित्रपटात पडक्या किल्ल्याचा परिसर दाखविलेला आहे. तो इनामदाराचा वाडा म्हणून ओळखला जातो. हा इनामदाराचा वाडा पूर्वी छ.शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजीराजांच्या कार्यकाळात हा किल्ला दोन एकरात बांधल्याचे बोलले जाते. या किल्ल्याचा मुख्य दरवाजा पुणे च्या शनिवाडापेक्षाही मोठा आहे. किल्ल्यातून नदीच्या पात्रापर्यंत भुयारी मार्ग होता. किल्ल्याला एकूण तीन प्रवेशद्वार आहेत. मुख्य दरवाजाच्या दोन्ही बाजूस उंच मनोरे आहेत. समोरून पाहताना हे मनोरे एखाद्या मिनारासारखे भासतात. मुख्यद्वारा शेजारीच देवडी असून तिला कमान असलेली रूंद खिडकी आहे. किल्ल्याला एकूण सहा चौरस आकार सारखे बुरूज आहेत. या किल्ल्यात एक चोर दरवाजा, बुरूज, तलाव आणि मागे एका बेटासारखे दिसणारे मंदिर नजरेस पडते. इथे एक अर्धवट तुटलेला रांजणही दिसतो. असा एक भव्य किल्ला आहे. भीमा नदीच्या पुरात लोकांनी या किल्ल्यात आसरा घेतल्याबाबतही जुने लोक सांगतात. १८९३ साली हा किल्ला कुगावचे इनामदारी यशवंत मेघशाम यांना त्यांची आई रमाबाई यांचे नावे दिला. तेथून पुढे हा किल्ला म्हणजे इनामदार वाडा म्हणून ओळखला जातो. १९७८ साली उजनी धरणाचे पाणी आडले आणि किल्ला पाण्यात झाकून गेला. पाणी कमी झाले की हा किल्ला उघडा पडतो.

या परिसराचा कायापालट करण्यासाठी जलमार्गांची गरज आहे. गंगावळण ते कुगाव, कळाशी ते कुगाव, कालठण ते कुगाव, शिरसोडी ते कुगाव अशा वेगवेगळ्या भागातून लॉंच किंवा बस व्यवस्था सुरू केल्यानंतर येथील पर्यटन अधिक विकसित होवू शकते. सध्या जेऊरवरून कुगाव हे १५ किलोमीटर अंतर आहे. परंतू रस्ता अतिशय खराब आहे. त्यामुळे पर्यटकांना तसेच भाविकांना येणे कठीण जात आहे. हा रस्ता झाल्यास चिखलठाण व कुगाव हे एकाच फेऱ्यात व एकाच वेळी पर्यटकांना उपलब्ध होऊ शकतात. या गावातील रहिवाशी व शासकीय अधिकारी दयानंद कोकरे तसेच माजी सरपंच तेजस्वीनी कोकरे तसेच सिताराम बल्लाळ सर याचबरोबर या गावातील रहिवाशी व आदिनाथचे चेअरमन धनंजय डोंगरे तसेच विठ्ठल डोंगरे, बाजार समितीचे माजी संचालक महादेव कामटे व गावातील अन्य ग्रामस्थ कुगावच्या विकासासाठी प्रयत्नशील आहेत.

यासाठी शासनाची आणि पर्यायाने तालुक्यातील पदाधिकाऱ्यांच्या पाठबळाची मोठी गरज आहे. या गावात कृषी पर्यटन, पक्षीनिरीक्षण केंद्र, नौकानयन, गावाजवळ उद्यान तसेच शेतीपूरक व्यवसाय अशा अनेक गोष्टी येथे होवू शकतात. जवळच कोकरे आयलॅन्ड याचीही उभारणी सुरू आहे. एकंदरीत कुगाव हे सुध्दा तालुक्याचे शक्तीस्थान असून त्याचा योग्य विनियोग केल्यास कुगाव आणि तालुक्याचे महत्व वाढल्याशिवाय राहणार नाही.

लोकसहभागातून गावाचा विकास साधावा : भास्करराव पेरे-पाटील

करमाळा(सं.प्र.): लोकसहभागातून गावाचा विकास होऊ शकतो; असे मत पाटोदा गावचे आदर्श सरपंच भास्करराव पेरे-पाटील यांनी व्यक्त केले.

विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे यांचे मार्गदर्शक सूचनेनूसार फिसरे येथे यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना व फिसरे ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हिवाळी श्रमसंस्कार शिबीरात आदर्शग्राम या विषयावर व्याख्यान देताना पेरे-पाटील बोलत होते. या कार्यक्रमास सरपंच प्रदीप दौंडे, उपसरपंच विजय अवताडे, सर्व ग्रामपंचायत सदस्य, वि.का. सोसायटी चे सर्व पदाधिकारी, ग्रामस्थ, स्वयंसेवक उपस्थित होते.

पुढे बोलताना पेरे-पाटील म्हणाले, की ज्या सुविधा गावात उपलब्ध करून द्यायच्या असतील त्या सार्वजनिक पध्दतीने उपलब्ध करून दिल्यास त्या स्वस्तात मिळू शकतात. तसेच गावात झाडे, रस्ते, पाणी, वीज, स्वच्छता त्यांनी दिलेल्या टॅक्सचा पुरेपूर मोबदला त्यांनी दिला पाहिजे. स्त्रियांना सन्मान आणि निराधारांना आधार देण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील यांनी वेळेचे महत्व व भास्करराव पेरे-पाटील यांनी त्यांच्या गावात राबवलेल्या योजना येथे राबवल्या गेल्यातर फिसरे गाव आदर्श गाव बनेल व त्याचा आदर्श इतर गावापुढे राहील; असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा.लक्ष्मण राख यांनी केले. सुत्रसंचालन प्रा.एम.डी.जाधव यांनी केले. आभार ग्रामसेवक केवारे यांनी मानले.

राज्यस्तरीय थाळीफेक स्पर्धेसाठी केम येथील ओंकार घाडगे याची निवड

करमाळा(सं.प्र.) : राज्यस्तरीय थाळीफेक स्पर्धेसाठी केम येथील श्री उत्तरेश्वर ज्युनियर कॉलेज मधील खेळाडू ओंकार धनंजय घाडगे यांची निवड झाली आहे. २३ जानेवारी रोजी पंढरपूर येथे झालेल्या विभागीय थाळीफेक स्पर्धेत ओंकार घाडगे याने प्रथम क्रमांक मिळवला होता. या यशामुळे त्याची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. ओंकारच्या यशासाठी त्याला मार्गदर्शक म्हणून क्रिडाशिक्षक प्रा.अमोल तळेकर यांनी मार्गदर्शन केले. तसेच त्याचे वडील धनंजय हनुमंत घाडगे यांनी त्याला लहानपणापासून या खेळासाठी प्रोत्साहन दिले आहे. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थापक सीईओ कौस्तुभ गावडे, मराठवाडा विभागप्रमुख प्राचार्य जयसिंग देशमुख, प्राचार्य एस.बी.कदम, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दयानंद तळेकर, उपाध्यक्षा उज्वलाताई संदीप तळेकर यांनी ओंकार घाडगे याचे अभिनंदन केले. यावेळी प्रहार संघटनेचे करमाळा तालुका अध्यक्ष संदीप तळेकर, अच्युतकाका पाटील, पै.महावीर तळेकर, युवा सेना जिल्हा समन्वयक सागरराजे तळेकर, भाजपा तालुका सरचिटरीस धनंजय ताकमोगे, विकास कळसाईत, आजिनाथ जाधव, दत्तात्रय तळेकर ग्रामस्थ उपस्थित होते.

नवभारत इंग्लीश स्कुल मध्ये प्रजासत्ताक दिन साजरा

करमाळा(सं.प्र.) : नवभारत इंग्लीश स्कुल मध्ये प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. आडत व्यापारी विजयकुमार दोशी यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर इंग्लीश स्कुल व गिरधरदास देवी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मार्च पास केले तसेच झेंड्याला सलामी दिली. भारतमाता, लालबहाद्दुर शास्त्री, मेरी कोम अशा विविध वेशभुषेत बालचमू उपस्थित होते. तिसरीच्या विद्यार्थ्यांनी लेझीम नृत्य सादर केले. शाळेचे अध्यक्ष कन्हैयालाल देवी, सुनिता देवी यांनी तसेच मुख्याध्यापिका सुनिता मोहिते सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. सुत्रसंचालन आश्विनी क्षीरसागर यांनी केले तर नरतवडेकर यांनी आभार मानले.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

संक्रांतनिमित्त न.पा स्वच्छता कामगार महिलांचा हळदी-कुंकू देऊन सन्मान

करमाळा(सं.प्र.) : ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले जयंती, राजमाता जिजाऊ जयंती व मकरसंक्रांतीचे औचित्य साधून जिल्हापरिषद प्राथमिक शाळा पोंधवडी येथील पदवीधर शिक्षिका मनिषा पेटकर (बाभळे) यांनी करमाळा नगरपालिकेतील स्वच्छता कामगार महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रम आयोजित केला होता. सर्व महिलांना संक्रांतीचे वाण म्हणून स्टेनलेस स्टीलच्या कप्प्याच्या ताटांचे व तीळगुळाचे वाटप करण्यात आले.

प्रास्ताविकात मनिषा बाभळे यांनी दरवर्षी संक्रांतीला विविध प्रकारचे उपक्रम जसे की महिलांना ५०० तुळशीच्या रोपांचे वाटप. करंज, पिंपळ, वड, चाफा अशा मोठ्या वृक्षांचे वाटप. गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, जैन विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी ५५०० रू. देणगी असे उपक्रम राबविले असल्याचे सांगितले. कोरोना काळात स्वत:चा जीव धोक्यात घालून करमाळा शहर स्वच्छ ठेवण्याचे काम स्वच्छता कामगार महिलांनी केले. यात त्यांच्या कार्याची दखल घेऊन एक सामाजिक बांधिलकी म्हणून प्रेमाची भेट म्हणून हे वाण दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महिला दक्षता समितीच्या अध्यक्षा भावना गांधी या होत्या. प्रमुख पाहूणे म्हणून कुसूमबाई पेटकर, मंजिरी जोशी, ऋतुजा दोशी, प्रिया परदेशी, संतोषी सोळंकी, सौ.देशमुख (माने) उपस्थित होत्या.

यावेळी मंजिरी जोशी यांनी वऱ्हाड निघाले लंडनला हा एकपात्री प्रयोग सादर करून उपस्थित महिलांची मने जिंकली. भावना गांधी यांनी महिलांच्या अडचणी, समस्या व त्यावरील उपाय सांगून सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. उपस्थितांचे आभार प्रिया परदेशी व ऋतुजा दोशी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सेवानिवृत्त मुख्याध्यापक सुधीर बाभळे यांनी परिश्रम घेतले.

पतंजली योग समितीचे फिसरे येथे योग-प्राणायम शिबीर संपन्न

करमाळा(सं.प्र.) : यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे फिसरे येथे श्रमदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्ताने पतंजली योग समितीच्या वतीने फिसरे येथे योगा प्राणायम चे प्रशिक्षण देण्यात आले. १७ ते २३ जानेवारी या कालवाधीमध्ये योगाचे प्रशिक्षण चालू होते. यात विद्यार्थी, प्राध्यापक वृंद तथा फिसरे ग्रामस्थ असे एकूण दीडशे जणांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला. प्रशिक्षक म्हणून पतंजली योग समितीचे तालुका प्रभारी बाळासाहेब नरारे यांनी काम पाहिले. यावेळी नरारे यांनी प्रत्येक खाजगी व जिल्हा परिषद शाळा, कॉलेज, शासकीय तथा निमशासकीय कार्यालये अशा ठिकाणी मोफत योगाचे प्रशिक्षण देण्याचा मनोदय व्यक्त केला.

प्रियंका आय केअर हॉस्पीटल
डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा.
मो.9423222266, 9604762600
डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
उपलब्ध सुविधा...
● मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
● जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
● फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
● सुसज्ज ऑपरेशन थिएटर ● एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री
● जपानच्या अत्याधुनिक कॉम्प्युटरवर नेत्र तपासणी व चष्म्याचे नंबर काढण्याची सोय
● नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार ● लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
सिध्दीविनायक ऑप्टीकल्स्
आमच्याकडे नंबरचे चष्मे व गॉगल्स योग्य दरात मिळतील.
बॅक ऑफ इंडिया शेजारी, बसस्टॅन्ड समोर, करमाळा. प्रोप्रा : वर्षा गायकवाड मो.९५२७२६८१८१/७७५६८२५८२६

ओजस हॉस्पिटल
OJS HOSPITAL
AIIOPATHY AYURVED HOMEOPATHY
डॉ.रोहन रामदास कुंभार
B.A.M.S. M.D.(Acu) D.G.O. स्त्रीरोग तज्ञ
डॉ.मनोज रामदास कुंभार
M.D. कन्सलटींग फिजीशीयन
डॉ.सौ.अंजली रोहन कुंभार
B.H.M.S. होमिओपॅथिक कन्सलटंट
✻ वेळ : सकाळी ८ ते रात्री ८ ✻
✻ २४ तास अत्यावश्यक सेवा ✻
डॉ.सौ.सायली मनोज कुंभार
M.sc. Biotech, Health & Nutrition आहारतज्ञ
ॲलोपॅथी, आयुर्वेद होमिओपॅथी शास्त्रांच्या संयुक्त चिकित्सा पध्दतीने खालील आजारांवर अचूक निदान व योग्य उपचार ● हृदयरोग व उच्च रक्तदाब ● मधुमेह ● थायरॉईड ● संधिवात ● पोटाचे आजार ● स्त्रियांचे आजार ● श्वसनसंस्थेचे आजार ● मणक्यांचे व हाडांचे विकार ● मुतखडा ● मुळव्याध ● सौंदर्य समस्या ● त्वचारोग व केशविकार ● आहारविषयक मार्गदर्शन..
उपलब्ध सुविधा : ECG, Multipara Monitor, Nebulisation(वाफेची सुविधा)
Glucometer (रक्तातील साखर तपासणी), प्रकृतीपरिक्षण, नाडीपरिक्षण, सुवर्णबिंदू प्राशन(जन्मापासून ते १६ वर्षा पर्यंत)
PAP SMEAR LBC, HPV DNA PCR, VILI & VIA Screening Test
(गर्भाशय मुख कर्करोग पूर्व तपासणीसाठी पुणे येथील नामांकीत लॅब गोलविलकर मेट्रोपोलिसशी संलग्नित)
पत्ता : चिवटे बंधू मिठाईवाले यांच्या समोर, घोलप ज्वेलर्सच्या वरच्या मजल्यावर
सुभाष चौक, मेनरोड, करमाळा. ● संपर्क : मो.9960334005, 9423333950

प्रिमियर लिग क्रिकेट स्पर्धेत शिवक्रांती संघ प्रथम बक्षीसाचा मानकरी

करमाळा (सं.प्र.) : हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीचे औचित्य साधून बाळासाहेबांची शिवसेना व युवा सेनेच्या वतीने आयोजित केलेल्या प्रिमियर लिग क्रिकेट स्पर्धेत शिवक्रांती स्पोर्टस् क्लब संघाने प्रथम क्रमांकाचे १५ हजार रूपयाचे बक्षीस पटकाविले आहे. द्वित्तीय क्रमांकाचे बक्षीस (१० हजार रू.) सिध्दार्थ स्पोर्टस् क्लब तर तृतीय क्रमांकाचे (७००१ रू.) गौतमा स्पोर्टस् क्लब, चौथ्या क्रमांकाचे बक्षीस (५००१ रू.) जेऊर क्रिकेट क्लब यांनी पटकाविले. बाळासाहेबांची शिवसेनेचे प्रवक्ते ॲड.शिरीष लोणकर यांच्याकडून विजेत्या संघांना ट्रॉफी प्रदान करण्यात आली. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी युवा सेना जिल्हा समन्वयक निखिल चांदगुडे, रवि आटोळे, संतोष सापते, रामा ढाणे, योगेश गानबोटे, विवेक हलवाई, अनिल पाटील यांनी परिश्रम घेतले.

भावपूर्ण श्रध्दांजली

स्व.महेशसिंग रूपसिंग जोहरी
(मृत्यू दि.२२/१/२०२३)

जन्म आणि मृत्यू नाही कोणाच्या हाती
काळाने तोडली सर्व नाती
मागे उरल्या फक्त आठवणी
जो आवडे सर्वांना तोचि आवडे देवाला

आमचे सहकारी अश्विन जोहरी यांचे पिताश्री **स्व.महेशसिंग रूपसिंग जोहरी** यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने जोहरी कुटूंबियावर दु:खाचा डोंगर कोसळला असून त्यांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. त्यांचे आत्म्यास चिरशांती लाभो, हीच ईश्वर चरणी प्रार्थना !

शोकाकुल

प्रकाश(आबा) क्षीरसागर, श्रीपाद काशिनाथ जोशी
अमर(भैय्या) करंडे, निलेश नानासाहेब लावंड (साहेब)

शंभुराजे जगताप यांच्या वतीने अंध व्यक्तींना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

करमाळा (सं.प्र.) : करमाळा शहरामध्ये गेली काही दिवस काही अंध कलाकार गाण्याच्या माध्यमातून आपली कला सादर करीत उदरनिर्वाह करीत आहेत. त्यांच्या सुश्राव्य अशा गायनकलेने मंत्रमुग्ध होत भाजपाचे युवा नेते शंभुराजे जगताप यांनी त्यांच्या कलेची कदर करत अंधत्वावर मात करून जगण्याची धडपड पाहिली व आपणही समाजाचे काही देणे लागतो.. या विधायक व उत्तरदायित्वाच्या भावनेने त्या कलाकारांना ब्लँकेट, गहू, तांदुळ आदी जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले.

याप्रसंगी माजी उपनगराध्यक्ष नारायण जगताप, बाजार समितीचे माजी उपसभापती दत्तात्रय अडसुळ, माजी नगरसेवक राजेंद्र ढेपे, बाजार समितीचे संचालक मयुर दोशी, सचिव विठ्ठल क्षीरसागर, व्यापारी सतीश काकडे, प्रितम लुंकड, मनोज पितळे, राहूल सोरटे आदी उपस्थित होते.

माहिती उपलब्ध नसलेल्या रेशनकार्डधारकांना अन्नधान्य वाटप करावे

बहुजन मुक्ती पार्टी करमाळा युनिटच्या वतीने निवेदन

करमाळा(सं.प्र.) : येथील अनेक रेशनकार्ड धारकांची माहिती ऑनलाईन उपलब्ध नसल्या कारणाने त्यांचे अन्नधान्य वाटप बंद करण्यात आले आहे. त्यामुळे ऑफलाईनद्वारे अन्नधान्य वाटप करण्यात यावे; या मागणीसाठी तहसीलदार समीर माने यांना बहुजन मुक्ती पार्टी करमाळा युनिटच्या वतीने निवेदन देण्यात आले. सदर निवेदनात म्हटले आहे, की करमाळा येथील अनेक रेशनकार्ड धारकांची माहिती ऑनलाईन उपलब्ध नसल्याकारणाने त्यांचे अन्नधान्य वाटप बंद करण्यात आले आहे. सदर माहिती अद्ययावत करण्यासाठी दोन ते तीन महिने लागणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे दोन ते तीन महिने रेशनकार्ड धारकांची अन्नधान्य अभावी गैरसोय होणार आहे. ही गैरसोय टाळण्यासाठी ऑनलाईन माहिती अपडेट होईपर्यंत रेशनकार्ड धारकांना ऑफलाईनद्वारे

अन्नधान्य वाटप करण्यात यावे; अशी मागणी निवेदनामध्ये करण्यात आली आहे.

यावेळी बहुजन मुक्ती पार्टीचे आर.आर. पाटील, विनोद हरिहर, दिनेश माने, कय्युम शेख, सोहेल दारूवाले, दवात्रय आवटे, कृष्णा कांबळे, अमोल आव्हाड, दिनेश दळवी, भीमराव कांबळे, मधुकर मिसाळ, गौतम खरात, शहाबुद्दीन शेख, बाबूराव पाटील, रावसाहेब जाधव, मैनुद्दीन शेख, माणिक शिंदे, दिपक भोसले, शोएब कुरेशी, रवी गोडगे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

आ.शिंदे यांनी दिलेला शब्द पाळला

डिकसळ-कोंढारचिंचोली नवीन पुलाचे टेंडर फायनल

करमाळा (सं.प्र.) : करमाळा तालुक्यातील पश्चिम भागातील तीन जिल्ह्यांच्या सीमेवर असणारा ब्रिटिशकालीन डिकसळचा पुल नुकताच खचला आणि वाहतूक बंद झाली. त्यामुळे प्रवासी, नागरीक, विद्यार्थी , शेतकरी व सर्वसामान्यांचा पर्यायी प्रवास कठीण झाला. नवीन पुलाच्या बांधकामास वेळ लागणार असल्यामुळे पश्चिम भागाची तात्काळ गरज ओळखून जुन्या पुलाचे डागडुजीसाठी दोन कोटी रूपयाची तरतूद आमदार संजयमामा शिंदे यांनी केली. परंतू करमाळा तालुक्यासह तीन जिल्ह्याला जोडणाऱ्या पुलाचा प्रश्न महत्वाचा होता. त्यासाठी आ.शिंदे यांनी ५५ कोटी रूपयांची मंजुरी महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळामध्ये मिळवली होती. सदर कामावरती नवीन सरकारने स्थगिती दिलेली होती. ती स्थगिती उठवून प्रत्यक्षात त्या पुलाचे कामकाज सुरू होण्याच्या दृष्टीने पुलाचे ३८ कोटी ६६ लाख ३१ हजार ४७० रूपयाचे टेंडर फायनल झाले आहे. पुलासाठी एकूण ५५ कोटी निधी मंजूर असून, सदर पुलाला जोडणाऱ्या जोड रस्त्याचे काम उर्वरित निधी मधून केले जाणार आहे. त्याचे टेंडर नंतर निघणार आहे

१० जानेवारी २०२३ पासून माझा करमाळा तालुक्यामध्ये गावभेट दौरा सुरू आहे. विशेषत: पश्चिम भागातील वेगवेगळ्या गावांमध्ये गेल्यानंतर डिकसळ पुलाविषयी लोकांकडून प्रश्न उपस्थित केले जात होते. या दरम्यानच हा पुलही खचला. या सर्व घडामोडीवरती मी बारीक लक्ष ठेवून होतो. सदर पुलाचे टेंडर ३१ जानेवारी पर्यंत फायनल होईल आणि प्रत्यक्षात उजनी धरणाचे पाणी मे महिन्यात वजा पातळीला गेल्यानंतर पुलाचे कामही सुरू होईल; असे नियोजन मी बोलून दाखवत होतो. प्रत्यक्षात टेंडर प्रसिध्दीची जाहिरातही आलेली आहे. त्यानूसार पुढील कामकाज निश्चितपणे होईल. तत्कालीन महाविकास आघाडी सरकार मधील उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी विशेष तरतूद करून हा निधी मंजूर केला.

...आमदार संजयमामा शिंदे

गुरूकुल मधील अनुराधा राऊत हिचे राज्य योगासन स्पर्धेत यश

करमाळा(सं.प्र.) : क्रिडा व युवक सेवा संचनालय पुणे यांच्या अंतर्गत कोल्हापूर येथे घेण्यात आलेल्या शालेय राज्यस्तरीय योगासन स्पर्धेत करमाळा येथील गुरूकुल पब्लिक स्कुलची दहावीतील विद्यार्थी अनुराधा पंकज राऊत हिने १७ वर्षाखाली मुलींच्या गटातून सांघिक तिसरे विजेतपद पटकाविले आहे. अनुराधा राऊत ही गेली दोन वर्षे योगासन प्रशिक्षक सागर शिरस्कर, संस्थेचे संस्थापक नितीन भोगे व रेश्मा भोगे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहे.

गासन स्पर्ध
-२०२३
आदर्श गुरुकु
पेठवडगांव,

कामगार पाहिजेत
मेडिकल दुकानात कामासाठी १० वी, १२ वी उत्तीर्ण
असलेले मुले/मुली पाहिजेत..!
संपर्क : श्री ओम मेडिको, भवानीपेठ, करमाळा. ९४२३२५३७८८

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर
रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
● सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स
विक्री व दुरुस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
दर महिन्याचा तिसरा रविवारी वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२
fastrack
HOT PICK

आपल्या मुला-मुलीच्या जीवनातील सर्वात अनमोल क्षण...
अधिक मंगलमय करण्यासाठी...
M सोनेरी क्षणाचे सोबती....
महामुनी मंगल कार्यालय
● कार्यालयाची वैशिष्ट्ये -
● सर्व शुभकार्यासाठी हवेशीर व प्रशस्त हॉल.
● वधुवरासाठी वातानुकुलीत / AC मेकअप रुमची सोय.
● १५०० लोंकाची क्षमता / स्वतंत्र डायनिंग हॉल.
● करमाळा शहराच्या १.५ कि.मी.अंतरावर.
● प्रशस्त पार्कींगची सोय.
● पाहुण्यांसाठी राहण्याची उत्तम सोय. ८ रुम उपलब्ध.
● आजचं बुक करा ●
● अधिक माहितीसाठी संपर्क ●
9423326587 / 7397811002
8390902342
संगोबा रोड, करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापूर

श्री विष्णू मंदिर ते श्री क्षेत्र पंढरपूर

माघवारी दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

करमाळा(सं.प्र.) : ह.भ.प.मंदाताई डोळस यांच्या मार्गदर्शनाखाली निघणाऱ्या किल्लावेस श्री विष्णू मंदिर ते श्री क्षेत्र पंढरपूर या माघवारी पायी दिंडी सोहळ्याचे २६ जानेवारीला सकाळी दहा वाजता पंढरपूरकडे प्रस्थान झाले आहे. माघवारी दिंडीचे २३ वे वर्षे असून, देवळाली, जेऊर, पांगरे, कंदर, वेणेगाव, परिते, करकंब, भोसे (सुतारवस्ती) मार्गे ही दिंडी पंढरपूरला पोहोचते. या दिंडीत काकडा, भजन, प्रवचन, हरिपाठ, बाराअभंग, किर्तन असे दैनंदिन कार्यक्रम होणार आहेत. ३१ जानेवारीला ही दिंडी पंढरपूरला पोहोचणार असून १ फेब्रुवारीला दिवसभर एकादशीचा कार्यक्रम व २ फेब्रुवारीला सकाळी दहा ते बारा ह.भ.प.मंदाताई डोळस यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. या दिंडीत मृदुंगाचार्य म्हणून घनशाम सुतार(कोंढेज), किसन खरात (सरपडोह), चैतन्य डोळस तसेच पेटीवादक म्हणून बाळासाहेब डोळस, विणेकरी म्हणून गोविंद फंड (नाना) हे काम पाहणार आहेत. या दिंडीचे नियोजन बाळासाहेब डोळस, कोंडिराम कुंभार, परशुराम पांडेकर यांनी केले आहे.

प.पू.समंतभद्र बालक मंदिराचे स्नेहसंमेलन संपन्न

करमाळा(सं.प्र.): प.पू.समंतभद्र शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम उत्साही वातावरणात पार पडला. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून यशकल्याणीचे गणेश करे-पाटील, शाळेचे अध्यक्ष अशोक दोशी, राजकुमार दोशी, अर्चना दोशी, अश्विनी दोशी, माजी नगरसेविका संगीता खाटेर आदी मान्यवर उपस्थित होते. या स्नेहसंमेलनात बालचिमुकल्यांनी आपल्या कला सादर करत उपस्थितांची मने जिंकली. करे-पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या कलेचे कौतूक करून त्यांना गोल्ड मेडल, सर्टिफिकेट तसेच प्रत्येकी १०० रूपये बक्षीस दिले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन भावना गांधी यांनी केले. नृत्यशिक्षिका श्रध्दा गांधी यांनी चिमुकल्यांना नृत्यकला शिकवली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी यशराज दोशी, प्रतिक दोशी, प्रितम दोशी, स्नेहल कटारिया, सविता चिंचकर, चित्रा पेठकर यांनी परिश्रम घेतले. उपस्थितांचे आभार ज्योतीताई पांढरे यांनी मानले. हा कार्यक्रम पाहण्यासाठी पालकांनी मोठी गर्दी केली होती.

वांगीचे सुपुत्र व उद्योजक सोमनाथ खराडे यांचा सत्कार

करमाळा(सं.प्र.) : स्टार्टअप बिझनेस २०२२ हा पुरस्कार मिळाल्याबद्दल वांगी गावचे सुपुत्र इंजिनियर व उद्योजक सोमनाथ बाळू खराडे यांचा प्रजासत्ताक दिनी रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लीश स्कुल वांगी नं.३ येथे ज्येष्ठ नेते महादेव आबा रोकडे यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक कांबळे सर, सरपंच मयूर रोकडे, आदिनाथचे संचालक पांडूरंग जाधव, मकाईचे संचालक संतोष देशमुख, उपसरपंच संतोष कांबळे, सदस्य सोमनाथ रोकडे, चंद्रकांत कदम, सोसायटी सदस्य दिनकर रोकडे, पं.स.चे माजी सदस्य सुहास रोकडे, ग्रा.पं.सदस्य शंकर जाधव, अर्जुन तकीक, सुतार सर, पोलीस पाटील गहिनीनाथ क्षीरसागर यांचेसह शाळेतील सर्व शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

मौलालीनगर अंगणवाडी शाळेस स्मार्ट टिव्ही भेट

करमाळा (सं.प्र.) : सामाजिक कार्यकर्ते व शिक्षणतज्ञ डॉ.एन.डी.पाटील यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त मौलालीनगर येथील अंगणवाडी क्र.१ शाळेस स्मार्ट टिव्ही भेट देण्यात आला. यावेळी यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील, माजी नगरसेविका स्वाती फंड, माजी मुख्याध्यापक रामचंद्र बोधे, एकात्मिक बालविकास सेवा योजनेचे सुपरवायझर सारीका सणगर आदी प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते. प्रतिमेचे पूजन करून उपस्थित पाहूण्यांचे हस्ते अंगणवाडी सेविका सुनिता शिंगाडे यांचेकडे स्मार्ट टीव्ही भेट देण्यात आला. यावेळी करे-पाटील म्हणाले, की मुलांना याचा वापर नक्कीच डिजीटल शिक्षणासाठी होईल व आदर्श विद्यार्थी घडतील ही एन.डी.पाटील यांना श्रध्दांजली होईल. यापुढे यशकल्याणीच्या वतीने सगळ्या अंगणवाडीसाठी रजिस्टर ठेवण्यासाठी कपाट व स्मार्ट टीव्ही भेट देण्यात येईल; असे आश्वासन दिले.यावेळी उपस्थित मान्यवरांनी अंगणवाडी शाळेची सजावट पाहून सर्व सेविका व मदतनीस यांचे कार्याचे कौतूक केले. यावेळी बालविकास प्रकल्प अधिकारी वर्षा पाटील, स्वाती फंड, सुपरवायझर सारीका सणगर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अंगणवाडी सेविका सुनिता शिंगाडे यांनी केले. उपस्थितांचे आभार अंगणवाडी सेविका वैशाली वडे यांनी मानले.

३ फेब्रुवारीला कंदर येथे

विश्वकर्मा जयंती उत्सव

करमाळा (सं.प्र.): विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज संघटनेच्यावतीने ३ फेब्रुवारीला कंदर येथील विठ्ठल मंदिरात विश्वकर्मा जयंती उत्सव साजरा करण्यात येणार आहे. जयंतीनिमित्त सकाळी दहा ते बारा ह.भ.प.संदिपान महाराज यांचे किर्तन होणार असून बारा वाजता प्रतिमेवर पुष्पवृष्टी केली जाणार आहे. त्यानंतर उपस्थितांना महाप्रसादचे वाटप केले जाणार आहे. तरी या कार्यक्रमास करमाळा शहर व तालुक्यातील पांचाळ सुतार समाज बांधवांनी उपस्थित रहावे; असे आवाहन अध्यक्ष अर्जुन गोविंदे यांनी केले आहे.

जयंती कार्यक्रमाच्या नियोजनानिमित्त जेऊर येथे पांचाळ सुतार समाज बांधवांची बैठक संपन्न झाली. यावेळी संघटनेचे अध्यक्ष अर्जुन गोविंदे, संदिपान सुतार (कंदर), भाऊसाहेब गोविंदे (देलवडी), भागवत राऊत, अशोक सुतार (पांगरे), संजय सुतार (कुंभारगाव), अशोक सुतार (केत्तूर), विकास दादा सुतार (शेलगाव), भागवत राऊत (वाशिंबे), शंकर सुतार (जेऊर), सिध्दीविनायक सुतार, शांताराम सुतार (जेऊर), हरी पिंपळे (करमाळा) यांचेसह बहुसंख्य सुतार समाज बांधव उपस्थित होते.

वांगी नं.२ येथे हळदी-कुंकवाचा कार्यक्रम संपन्न

करमाळा(सं.प्र.): वांगी नं.२ येथे ग्रामपंचायतीच्या वतीने मकरसंक्रांती निमित्त हळदी-कुंकूवाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहूण्या म्हणून शेलगाव येथील सरपंच लता ठोंबरे या उपस्थित होत्या. यानिमित्त महिलांच्या संगीत खुर्ची, उखाणे स्पर्धा घेण्यात आल्या. विजेत्यांना सरपंच ठोंबरे यांच्या हस्ते पैठणी तर उपविजेत्यांना गृहोपयोगी वस्तू बक्षीस म्हणून वितरीत करण्यात आले. शेवटी अल्पोपहार व वाण लुटण्यात आला. या कार्यक्रमास १५० महिला उपस्थित होत्या. या कार्यक्रमास रणरागिणी महिला बचत गटाच्या अध्यक्षा कावेरी मोरे यांचे विशेष सहकार्य व परिश्रम लाभले. सौ.मोरे यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व सुत्रसंचालन करून आभार मानले.

इथं सौंदर्य जन्म घेतं..
होलसेल साडी डेपो
मो.9172092187
प्रोप्रा : मुन्नाशेठ हासिजा
सुरतच्या होलसेल भावात साड्या मिळतील.
साड्यांचा भरपूर स्टॉक व
भरपूर व्हरायटीमध्ये उपलब्ध !
घरगुती विक्रीसाठी साड्या होलसेल दरात मिळतील
लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स भवानीपेठ, करमाळा.
ॲड.आशुतोष ल.हासिजा (मुंबई हायकोर्ट) मो.7387832186

शिवश्री क्लिनिक
डे केअर सेंटर
डॉ.आशुतोष पोपट कापले
B.H.M.S.(M.U.H.S.) Nasik
जनरल फिजीशियन ॲन्ड होमिओपॅथिक कन्सल्टन्सी
मो.9860982072

उपलब्ध सुविधा...
- ॲडमिट करण्याची सुविधा.
- ई.सी.जी. सुविधा
- बालरूग्णांसाठी वाफेची सुविधा

२४ तास अत्यावश्यक सुविधा
- वेळ : सकाळी ११ ते रात्री १०

आमची वैशिष्ट्ये....
- सर्व आजारांवर ॲलोपॅथिक, होमिओपॅथिक उपचार.
- मुळव्याध, त्वचा विकार उपचार.
- मानसिक आजारांवर उपचार.
- नपुसंगतेवरील उपचार.
- आहारासंबधी योग्य मार्गदर्शन.
- मशीनव्दारे रक्तातील शुगर(BSL) व Blood Precesure तपासणी व उपचार.
- जुनाट मधुमेहातील जखम व संधिवात विकारांवर उपचार

टीप भारतीय सैन्य दलातील जवानांची तपासणी फी घेतली जाणार नाही.

अहमदनगर येथील प्रसिध्द किडनीविकार तज्ञ
डॉ.आनंद काशिद (मुत्रविकार तज्ञ, लैंगिक विकार तज्ञ व किडनी ट्रान्सप्लान्ट सर्जन)
प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी, करमाळा येथे
ओपीडी वेळ सकाळी १० ते १.००

पत्ता : सचिन मेडिकल समोर, B.M. कॉम्प्लेक्स, दत्तपेठ, करमाळा.

गाळे भाड्याने देणे आहे

मासिक भाडे 1500/-

जामखेड रोड लगत
रामदेव बाबा स्टील ट्रेडर्सच्या
मागील बाजूला असलेले सर्व सुविधायुक्त
रोडटच गाळे भाड्याने देणे आहे

अधिक माहितीसाठी संपर्क : 8308309127, 7057587039

॥ गणेश कृपा ॥ ॥ श्री नागनाथ प्रसन्न ॥

श्री गणेश ड्रायफ्रुटस् & मसाला

सर्व ग्राहक, हितचिंतक, स्नेही व मित्र परिवार
यांचे सहकार्याने आम्ही ८ व्या वर्षात पदार्पण करीत आहोत.
त्याबद्दल सर्वांचे आभार व धन्यवाद !

वर्धापन दिन

ग्राहकांसाठी खास ऑफर...

1000 रूपयाच्या खरेदीवर ७ टक्के डिस्काउंट

ऑफर

दि.२/२/२०२३ ते दि.१७/२/२०२३
(१५ दिवस मर्यादित कालावधी)

TULUNADU FLAVOURS
TULUNADU FLAVOUR
TULUNA FLAVOU

प्रोप्रा : पोपट बोराडे (मो.8605633839)

पत्ता : गुजरगल्ली, करमाळा., जि.सोलापूर

मा.श्री.उमाकांत जाधव साहेब

वीट गावचे सुपुत्र व आमचे मित्र
श्री.उमाकांत जाधव साहेब
यांना कृषी विभागातील उत्कृष्ट
कामकाजाबद्दल जिल्हाधिकारी यांचे
हस्ते सन्मानित करण्यात आल्याबद्दल
त्यांचे.... हार्दिक अभिनंदन

शुभेच्छुक

जय बजरंगबली टूर्स अॅन्ड ट्रॅव्हल्स्, पोंधवडी
प्रोप्रा : मयुर राऊत, ८८८८३३३६३८

एस.एस.के.एस. असोसिएटस्

अकौंट मॅनेजर पाहिजेत

सीए फर्म मध्ये अकौटींगसाठी जागा भरणे आहे. (महिलांना प्रथम प्राधान्य)

पदासाठी अटी खालीलप्रमाणे..

- **कामाची वेळ :** सकाळी १० ते सायं ६.३० (महिलांसाठी वेळ त्यांच्या गरजेनूसार अॅडजेस्ट)
- **पात्रता :** कोणत्याही शाखेतील शिक्षण (मराठी, इंग्रजी नीट वाचता व लिहिता यावे) संगणक व्यवस्थित वापरता येणे आवश्यक.
- **पगार :** ६००० रू. किंवा त्यापेक्षा जास्त दिला जाईल.

संपर्क : सीए लहू काळे (मो.९७६२४४८२८२/९४२०४४८२८२/०२१८२-२२२१०३)

पत्ता : विद्यानगर, नवीन कोर्टासमोर, गाळा नं.१ व २, करमाळा.

टीप : येताना शैक्षणिक बायोडाटा घेवून येणे.

ARISTO KIDS
Talent Hunt
INTERNATIONAL LEVEL
& V HS C IP

मार्गदर्शक

ज्योती मुथा मॅडम

हार्दिक अभिनंदन

मार्गदर्शक

पल्लवी भिंगारे

ॲरिस्टो किडस् मार्फत घेण्यात
आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस
परीक्षेत **चि.आदित्य सुहास कापसे** याने थर्ड लेवलमध्ये
विथ अबॅकस व विदाऊट अबॅकसमध्ये चौथा क्रमांक पटकाविल्याबद्दल
तसेच त्याची दिल्ली येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल
व राष्ट्रीय स्तरावर सहभाग **आयर्न शामराज कापसे** याचे हार्दिक अभिनंदन !

शुभेच्छुक : • जि.प.कर्मचारी वृंद • घोलप हार्डवेअर अॅन्ड पेंटस् • सुहास नागनाथ कापसे

भावपूर्ण श्रध्दांजली

दिवस मावळला तरीही..,
संधिप्रकाश रेंगाळत असतो ।
त्याप्रमाणे तुझा सहवास संपला तरीही..,
तुझ्या आठवणींचा सुगंध दरळवत असतो ।।

आमच्या मातोश्री

श्रीमती आनंदमती नेमचंद दोशी

यांचे २६ जानेवारी रोजी निधन झाले.
ईश्वर त्यांचे आत्म्यास चिरशांती देवो, हीच आमची प्रार्थना..!
व स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली !

शोकाकुल

श्री.अशोककुमार नेमचंद दोशी , श्री.राजकुमार नेमचंद दोशी
व समस्त दोशी परिवार, मेनरोड, करमाळा.

प्रथम वर्षश्राध्द

कै.पांडुरंग गोपाळ जोशी (गुरूजी)
(वर्षश्राध्द : दि.३०/१/२०२३)

तुमचा सहवास सर्वांसाठी सुखाचा क्षण होता
चैतन्याचा श्रावण होता, आनंदाचा सण होता
पण.. 'दादा' तुम्ही आम्हाला सोडून गेलात
आणि आम्ही अगदी पोरके झालो
पुनर्जन्म घ्यावा तुम्ही हीच आमची श्रध्दांजली !

जुन्या पिढीतील आदर्श शिक्षक व आमचे पिताश्री

कै.पांडुरंग (दादा) गोपाळ जोशी (गुरूजी)

यांचे दि.३०/१/२०२३ रोजी असलेल्या प्रथम वर्षश्राध्द दिनानिमित्त
त्यांचे स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली !

शोकाकुल

अविनाश पांडुरंग जोशी, गिरीष पांडुरंग जोशी, संजय पांडुरंग जोशी
समस्त जोशी व जोगळेकर परिवार, किल्लाविभाग, करमाळा.

श्री कमलाभवानी प्राथमिक
शिक्षक सहकारी पतसंस्थेचे सचिव

श्री.सुनील कदम गुरूजी

यांना दि.२९ जानेवारी रोजी
असलेल्या वाढदिवसास..

हार्दिक शुभेच्छा

शोकाकुल

मराठा मंदिर ज्वेलर्स मेनरोड, करमाळा.

श्री साई बिल्डर्स अ‍ॅन्ड डेव्हलपर्स, बायपास रोड, करमाळा

गुरूकृपा बिल्डर्स अ‍ॅन्ड डेव्हलपर्स, गणेशनगर, करमाळा

कमलाई स्टील इंडस्ट्रीज, एम.आय.डी.सी. करमाळा.

आनंदमती नेमचंद दोशी यांचे वृध्दपकाळाने निधन

करमाळा (सं.प्र.) : येथील श्रीमती आनंदमती नेमचंद दोशी (वय–९७) यांचे २६ जानेवारीला सायंकाळी साडेपाच वाजता निधन झाले आहे. त्यांचे मागे दोन मुले, सहा मुली, सुना, नातवंडे, परतंवडे असा परिवार आहे. त्यांचेवर २७ जानेवारीला सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधी प्रसंगी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक, व्यापारी वर्ग तसेच आप्तेष्ट उपस्थित होते. प्रसिध्द आडत व सोन्याचे व्यापारी अशोक दोशी व प्रसिध्द कापड व्यापारी राजकुमार दोशी यांच्या त्या मातोश्री होत. आनंदमती दोशी या मनमिळावू व धार्मिक वृत्तीच्या होत्या. जैन धर्माचे तत्वाचे विशेष पालन करून धार्मिक उपवासाचे व्रत या वयातही त्या करत होत्या. एवढेच नाहीतर कोरोना महामारीच्या काळातही त्यांनी इच्छाशक्तीच्या जोरावर घरगुती उपचार घेऊन कोरोनावर मात केली होती.

ईगल लीप व राणा नोबल इंग्लीश स्कुलचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

करमाळा(सं.प्र.) : श्री गुरूदेव शिक्षण प्रसारक मंडळ बारामती संचलित ईगल लीप इंग्लीश मिडियम प्रीस्कुल करमाळा व राणा नोबल इंग्लीश मिडियम स्कुल यांच्या संयुक्त विद्यमाने वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम उत्साही वातावरणात संपन्न झाला.

करमाळा येथे अल्पावधीत शाळेने शिक्षणाचा दर्जा अतिशय चांगला ठेवून या परिसरातील विद्यार्थ्यांसाठी एक चांगली शैक्षणिक संस्था तयार करण्याचे काम संस्थेचे अध्यक्ष महेश दिवेकर व स्वप्नाली दिवेकर यांनी केले आहे; असे मत विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष मिलींद फंड यांनी व्यक्त केले.

यावेळी यशकल्याणीचे गणेश करे–पाटील यांनी कार्यक्रमाचे नेटके नियोजन केल्याबद्दल कौतूकाची थाप दिली. वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम विद्यानगर येथे संपन्न झाला. यावेळी करमाळा तालुका ग्रंथालय संघाचे अध्यक्ष सुजित बागल, संजय ट्रेकिंग सेंटर पाचगणीचे नरेश लोहारा, सुरताल संगीत विद्यालयाचे बाळासाहेब नरारे, पं.स.शिक्षण विभागाचे विषय तज्ञ आदलिंग, उपप्राचार्य संभाजी किर्दाक, चौधरी सर, प्राचार्या स्वप्नाली बागल, उपाध्यक्ष विजय बागल, सचिव बाळासाहेब धुमाळ, पोपट धुमाळ, विभागप्रमुख सचिन पाटील, उपप्राचार्या प्रिती शिंदे, आबासाहेब बागल, अभिषेक बागल यांचेसह सर्व पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नरेश लोहारा यांनी केले. कृष्णा जाधव व त्यांची टीमने चांगल्या पध्दतीने कोरिओग्राफी केली. आभार मोहिनी बागल यांनी मानले. यावेळी स्कुल मधील चिमुकल्यांनी नृत्याविष्कार सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

इंग्रजी विषय शिक्षकांसाठी ३१ जानेवारीला कार्यशाळा

करमाळा : येथील इंग्रजी टिचर असो;, पंचायत समिती शिक्षण विभाग व यशकल्याणी सेवाभावी संस्था यांचे संयुक्त विद्यमाने तालुक्यातील इंग्रजी विषय शिक्षकांसाठी ३१ जानेवारीला कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाच्या डॉ.श्रृती चौधरी, डायएट वेळापूरचे विशेष समन्वयक प्रा.सुलतान चाँद शेख यांचे मार्गदर्शन होणार आहे. तसेच या कार्यशाळेत यशकल्याणीचे अध्यक्ष गणेश करे–पाटील, ग्रामसुधार समितीचे अध्यक्ष डॉ.अॅड.बाबूराव हिरडे, गटविकास अधिकारी मनोज राऊत, गटशिक्षणाधिकारी राजकुमार पाटील यांचेही भाषणे होणार आहेत. ३१ जानेवारीला यशकल्याणी सेवाभावी संस्थेमध्ये सकाळी साडेनऊ ते चार वाजेपर्यंत या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे; अशी माहिती सुखदेव बिलबिले यांनी दिली.

प्रोप्रा : सुर्यकांत कदम
करमाळा तालुक्यात प्रथमच
मो.9623138222
9623849468
माऊली
रोलींग शटर्स & मटेरियल सप्लायर्स
होलसेल दरात शटरचे सर्व मटेरियल व शटरची कामे तसेच फॅब्रीकेशनची कामे करून मिळतील.
M.S.डिझाईनचे होलसेल विक्रेते
तयार शटर 100 रू. किलोप्रमाणे मिळेल.
श्री कमलादेवी औद्योगिक वसाहत, मौलालीमाळ, जेऊर रोड, करमाळा.

गोडावून भाड्याने देणे
२ ते ४ हजार स्क्वेअर फूटचे सर्व सुविधायुक्त
असलेले गोडावून भाड्याने देणे आहे
● संपर्क : 8308309127

गजानन स्पोर्टस् क्लबच्या वतीने गणेश जयंती उत्साहात साजरी

पाच ते साडेपाच हजार नागरीकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

करमाळा(सं.प्र.) : वेताळपेठ येथील गजानन स्पोर्टस् अॅन्ड सोशल क्लबच्या वतीने गणेश जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यंदाचे मंडळाचे २३ वर्ष असून सर्व जातीधर्माचे लोक यामध्ये सहभागी होऊन गणेश जयंती एक आनंद उत्सव म्हणून साजरा करतात. गणेश जयंतीनिमित्त सकाळी आठ ते एक या वेळेमध्ये गणेश याग, सहस्त्र आवर्तन होमहवन, दुपारी साडेचार ते साडेपाच महिलांचे श्री गणेशाचे अथर्वशीर्ष पठण आदी कार्यक्रम झाले. यानंतर साामजिक बांधिलकेच्या भावनेतून समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळावा, या हेतूने मुकबधीर शाळेतील विद्यार्थ्यांच्या हस्ते श्री गणेशाची आरती करून नागरीकांना महाप्रसाद देण्यात आला. या महाप्रसादाचा लाभ पाच ते साडेपाच हजार नागरीकांनी घेतला. यामध्ये महिलांची संख्या मोठ्याप्रमाणात होती. पुरूष व महिलांची बैठक व्यवस्था वेगवेगळी करण्यात आली होती. गणेश जयंती उत्सवामध्ये शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी श्री गणेशाचे दर्शन घेऊन गजानन स्पोर्टस् अॅन्ड सोशल क्बलच्या उपक्रमाचे कौतूक केले. क्लबचे संस्थापक व माजी नगराध्यक्ष प्रशांत ढाळे यांनी गणेश जयंती उत्सव सुरू करून करमाळा शहरात भक्तीमय वातावरण निर्माण केले. सामाजिक एकोपा जपण्यासाठी हे कार्य प्रेरणादायी असल्याचे मत नागरीकांनी व्यक्त केले. उत्सव यशस्वी करण्यासाठी गजानन स्पोर्टस् अॅन्ड सोशल क्बलच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

करमाळा तालुक्यातील शेतकऱ्याचे शरद पवार यांनी केले कौतूक

करमाळा (सं.प्र.) : पत्नीला कृषी प्रदर्शन आणि मुलांना सायन्स सेंटर दाखविण्यासाठी बारामतीला घेऊन येणाऱ्या करमाळा तालुक्यातील शेतकऱ्याचे खासदार शरद पवार यांनी कौतूक केले.

बारामती येथे अॅग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टच्या वतीने १९ ते २३ जानेवारी दरम्यान भव्य कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. हे प्रदर्शन पाहण्यासाठी राज्यातील अनेक ठिकाणाहून शेतकरी येत असतात. परंतू करमाळा तालुक्यातील नितीन तकीक या शेतकऱ्याने हे प्रदर्शन पाहण्यासाठी आपल्या पत्नी सोनाली व सायन्स सेंटर पाहण्यासाठी पाचवीत शिकत असलेला मुलगा अजिंक्य व सातवीतील मुलगी किर्ती यांना बारामती येथील सायन्स सेंटर पाहण्यासाठी आणल्याबद्दल त्यांचे कौतूक केले व मुलांबरोबर फोटो सुध्दा काढले.

राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार या वयातही विविध ठिकाणी सुरू असलेल्या गोष्टी पाहण्यासाठी आवर्जुन जातात २२ जानेवारी रोजी ते बारामती येथे सुरू असलेल्या कृषी प्रदर्शनाला भेट देण्यासाठी उपस्थित होते. प्रदर्शनात फिरताना त्यांनी अनेक शेतकऱ्यांशी

संवाद साधला. तसेच सायन्स सेंटरलाही त्यांनी भेट दिली. त्यावेळी करमाळा तालुक्यातील शेतकरी तकीक आपल्या पत्नी व मुलांसोबत सायन्स सेंटर पाहत होते. त्यावेळी शरद पवार यांनी त्यांची विचारपूस केली. शेतकरी असूनही करमाळा तालुक्यातून पत्नीला कृषी प्रदर्शन पाहण्यासाठी व मुलांना सायन्स सेंटर पाहण्यासाठी घेऊन आल्याचे सांगितल्यावर त्यांनी तकीक परिवाराचे कौतूक केले.

सावंतगल्ली 'एकसंघ' का ?

सावंतगल्ली आणि आमचं नातं हे फॅमिली गेस्टप्रमाणे आहे. फॅमिली डॉक्टर ज्याप्रमाणे ठराविक फॅमिलीची वैद्यकिय काळजी घेतो त्याप्रमाणे या गल्लीतील कोणताही कार्यक्रम असो, त्यासाठी एक घरचा पाहूणा म्हणून सावंतगल्लीचेही निमंत्रण असते आणि आम्हीही हजर असतो. सावंतगल्लीतील युवा नेते मंडळीपासून ते कै.डि.के.सावंत भाऊ, कै.अनंतराव सावंत आबा, कै.सुभाषराव सावंत आण्णा या सर्वांबरोबर कायम संपर्क आलेले आहेत. इतरांचे अनुभव पाहत असताना सावंतगल्ली एकसंघ का ? याचे उत्तर मला गेल्या आठवड्यात मिळाले.

माझी डायरी

सावंतगल्लीतील केशव मोरे यांची जमीन सहा वर्षापूर्वी खरेदी केली होती. त्या जमिनीतून कुकडी कॅनॉल गेला आहे. कुकडी कॅनॉलची येणारी रक्कम आम्हाला मिळावी ही अपेक्षा मोरे परिवाराची होती. त्यानूसार त्यांना आवश्यक तेथे संमतीपत्रही दिले होते. आणखी एकदा त्यांना संमतीची गरज होती. काही अडचणीमुळे संमती थोडी लांबत चालली होती. दरम्यान गेल्या आठवड्यात मा.नगरसेवक संजय सावंत यांचा फोन आला व मला भेटायला यायचं आहे. त्यावेळी त्यांना या म्हणून सांगितले. त्यानंतर श्री.सावंत हे कार्यालयात आले आणि त्यांनी मोरे यांच्या संमतीचा विषय काढला त्यावेळी त्यांना संमतीबाबत अडचण नाही, परंतू जी संपादीत झालेली जमीन आहे तेवढी जमीन सोडून त्यांनी खरेदी केलेली जमीन मोजून द्यावी; ही अपेक्षा आहे. त्यावर त्यांनी एका सेकंदाचाही विचार न करता, एकदम बरोबर आहे. आपण ती जमीन तुम्हाला मोजून देऊ. त्यानंतर जमीन मोजण्याचा निर्णय ठरला तोही चक्क मकरसंक्रांतीचा दिवस होता. वडगावचे जगदाळे यांना बोलविले आणि सकाळी दहा वाजल्यापासून दुपारी दोन पर्यंत मोजणीचे काम चालू होते. विशेष म्हणजे मोजणी सुरू झाली तेव्हापासून संपूर्ण मोजणी होईपर्यंत संजय सावंत तसेच त्यांचे अन्य मित्र यावेळी उपस्थित होते. त्यांनी कुकडीच्या अधिकाऱ्याला विचारून जेवढी संपादीत जमीन आहे तेवढी बाजूला काढून उर्वरित क्षेत्र मोजले. जेवढे कमी भरले तेवढे श्री.मोरे यांना तात्काळ देण्यास सांगितले आणि मोरे यांनीही ते लगेच मोजून ताब्यात दिले.

हकीकत सांगायला ही सहज सोपी असलीतरी ती इतकी सहज नाही. छोट्या छोट्या गोष्टीसाठी कोर्टातील फेऱ्या कशा असतात हे आम्ही वर्षानुवर्षे पाहतो. परंतू सावंत गल्लीतील विठ्ठल आप्पा सावंत, भगवान नाना सावंत, गोपाळ बापू सावंत, दादासाहेब सावंत यांच्या पाठोपाठ मा.नगरसेवक संजय सावंत, सुनील बापू सावंत ही मंडळी कोणाचेही काम असो तात्काळ आणि नियमबध्द करतात. कोणाचीही बाजू न घेता सत्य आणि स्पष्ट निर्णय देतात. त्यामुळे त्याचा फायदा इतरांना तर होतोच पण गल्लीतील कोणाचेही कोणतेही काम आडत नाही. म्हणूनच सावंतगल्ली एकसंघ का ? याचे उत्तर यानिमित्ताने समजले.


UAIMS
अत्याधुनिक उपचारांसाठी आता पुण्या मुंबईला धावाधाव कशाला ?
कारण येणार आहेत उषःकाल अभिनवचे डॉक्टर तुमच्या भेटीला!
उषःकाल अभिनवच्या डॉक्टरांची कोग्रेकर हॉस्पिटल, करमाळा येथे ओपीडी भेट.
स्त्रीरोग व प्रसूती तज्ज्ञ
डॉ. संजय कोग्रेकर
डॉ. स्वाती कोग्रेकर
Consultant Gynaecologist
बालरोग तज्ज्ञ
डॉ. विनया सारंगकर
Consultant Pediatrician
हृदयरोग तज्ज्ञ
डॉ. राहुल महाडिक
Consultant Interventional Cardiologist
हृदय शस्त्रक्रिया
डॉ. अमोल भोजे
Consultant Cardiothoracic & Vascular Surgeon
सांधे प्रत्यारोपण
डॉ. समीर शेख | डॉ. रवींद्र भरमगुंडे
Consultant Orthopedic Surgeon
रजिस्ट्रेशन फी ₹200
वार व तारीख : रविवार, 29 जानेवारी 2023 | ओपीडीची वेळ : स. 10 ते सायं. 4
पत्ता: कोग्रेकर हॉस्पिटल, भवानी नाका, जेऊर रोड, करमाळा
- संपर्क -
थोरात सिस्टर : 996-090-6407

कष्ट म्हणजे काय असते आणि कष्टावरती काय मिळवता येते...

हे फक्त साळुंके परिवार सांगू शकतो !

कष्ट तर अनेकजण करतात आणि कष्टातच संपतात. पण विचार-पूर्वक आणि सातत्य राखल्यानंतर यश कसे मिळवता येते मुर्तिमंत उदाहरण म्हणजे पोथरे येथील साळुंके परिवाराचे देता येईल. अंकुशनाना साळुंके व त्यांचे बंधू कै.कांतीलाल साळुंके या दोघा बंधूनी मेहनत आणि भविष्यातील स्वप्नं पाहत परिवाराची मिळालेली शेती आदर्श करत उत्पन्न मिळवलेच पण त्याबरोबर परिवार सुसंस्कृत करण्याच्या दृष्टीने त्यांनी मोठे यश मिळवले आहे.

पोथरे येथे साळुंके परिवार हा अतिशय शांत आणि संयमी परिवार म्हणून ओळखला जातो. कोणाच्याही भानगडीत न पडता आपले काम भले आणि आपण भले असे म्हणत या परिवाराने गावातील अनेकांशी स्नेहाचे संबंध जोडले आहेत. अंकुश साळुंके आणि कांतीलाल साळुंके हे दोन बंधू राम लक्ष्मणासारखे होते. दुर्दैवाने सन २००२ मध्ये कांतीलाल साळुंके यांचे विहिरीत काम करताना अपघाती निधन झाले. त्यानंतर अंकुशनाना साळुंके यांच्यावरती सर्व परिवाराची जबाबदारी पडली. त्यांनीही अतिशय समर्थपणे ही जबाबदारी पार पाडली. भावाच्या निधनानंतरही पाच वर्षे एकत्र राहून पुतण्या किरण कांतीलाल साळुंके हा स्वत:च्या पायावर मजबूत उभा राहिल्यानंतर त्यांच्यात विभागणी झाली.

साळुंके परिवाराने वडिलार्जित मिळकतीत कष्ट आणि प्रयत्नाच्या जोरावर आणखीन २२ एकर मिळकत विकत घेतली आहे. शेतीमध्ये वेगवेगळे प्रयोग केले आहेत. ऊस, लिंबोणी, डाळींब, पपई, अशी वेगवेगळी पिके तर घेतलीच पण जोडीला दूध व्यवसाय, शेळीपालन, कुकूटपालन हेही व्यवसाय केले. सोबत ट्रॅक्टर असल्याने काही वर्षे ऊस टोळी मजुराच्या सहाय्याने कारखान्याला ऊस पुरविण्याचे कामही त्यांनी केले आहे. एवढेच नाहीतर दूध डेअरीचा व्यवसायही त्यांनी करून प्रगतीत एक पाऊल पुढे टाकले. शेतीतील आवश्यक असणारी सर्व अवजारे त्यांच्याकडे असून येणाऱ्या गरजू माणसाला ते कायम मदत करत असतात.

स्वत:च्या प्रगतीबरोबरच इतरांना जिथे आवश्यक असेल तिथे ते मदतीचा हात देतात. धान्य असो नाहीतर वस्तू असो नाहीतर शारिरीक श्रम असो . कधीही ते मागे घेत नाहीत. अंकुशनाना साळुंके यांची मुले विलास व अमोल तसेच पुतण्या किरण हे सर्व राजकारण विरहित सामाजिक कार्यात सहभागी असतात. या बाबीमुळे या परिवाराने ग्रामस्थांच्या हृदयात स्थान मिळवले आहे.

कोरोनाच्या धक्क्यानंतरही साळुंके परिवार स्थिर

कोरोनाच्या कालावधीत अंकुशनाना साळुंके या परिवारावर मोठे संकट आले. ११ जणापैकी ९ जण रूग्णालयात दाखल होते. जवळपास १३ ते १४ लाख रूपये दवाखान्याला गेले. परमेश्वराच्या कृपेने सर्वजण सुरक्षित राहिले. ही बाब महत्वाची आहे. या परिवारातील सौ.सुनंदा अंकुश साळुंके , मुले विलास अंकुश साळुंके, अमोल अंकुश साळुंके, सुना वैष्णवी विलास साळुंके, प्रियंका अमोल साळुंके, नातवंडे विराज विलास साळुंके, प्रतिक अमोल साळुंके, आरती अमोल साळुंके हे सर्वजण एका विचाराने कार्यरत असून घरातील सर्व काम मोठ्या ताकदीने करत असल्याने घर एकसंघ आहे. त्यामुळे घराची प्रगती आहे. आता अंकुशनाना यांचे नातवंडे कुस्तीपासून संगणकाचे शिक्षण घेतात. त्याचबरोबर करमाळा येथील माध्यमिक विद्यालयात उत्तमप्रकारे शिक्षण घेत आहेत. एकंदरीत कष्टाच्या जोरावर कसे उभे रहावे व माणसे कशी जोडावी हे साळुंके परिवाराकडून शिकण्यासारखे आहे.

गणेश जयंतीनिमित्त स्वराज्य ग्रुपच्या वतीने वीटभट्टी कामगारांना मिष्टान्न वाटप

करमाळा(सं.प्र.) : गणेश जयंती निमित्त वेताळपेठ येथील स्वराज्य ग्रुपच्या वतीने करमाळा परिसरातील वीटभट्टीवरील काम करणाऱ्या शंभर कामगारांना मिष्टान्न (जेवण) देण्यात आले. यावेळी ग्रुपचे अध्यक्ष पार्थ माळवे, उपाध्यक्ष शंतनु कुलकर्णी, सौरव शिंपी, शुभम माळवे, पियुष शिंपी, प्रणव जोशी, सौरभ जाधव, मोनू सातपुते, सक्षम दळवी, साईराज मोरे आदी उपस्थित होते. या उपक्रमाचे वीट कामगारांनी कौतूक करून स्वराज्य ग्रुपचे आभार व्यक्त केले.

पोफळज येथील २० वर्षाची युवती बेपत्ता

करमाळा(सं.प्र.) : पोफळज येथील २० वर्षाची विवाहित युवती ही पोफळज येथून बेपत्ता झाली आहे. या प्रकरणी पालकांनी पोलीसात हरवल्याची तक्रार २० जानेवारीला केली आहे. यात सदरची युवती घरातून बाहेर जाऊन येते म्हणून निघून गेली ती परत आलीच नाही. याबाबत गावात तसेच नातेवाईकांकडे चौकशी केली परंतू युवती सापडली नाही. पालकांनी हरवल्याची तक्रार पोलीसात केली.

मटका घेणाऱ्याविरूध्द गुन्हा दाखल

करमाळा (सं.प्र.): कल्याण मटक्याचे आकडे घेणाऱ्या विरूध्द पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार १९ जानेवारीला सायंकाळी साडेपाच वाजता गुळसडी येथे घडला आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल तौफिक रज्जाक काझी यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की गुळसडी येथे भीमनगर भागात कल्याण मटका आकडा घेणारा इसम असल्याची माहिती मिळाल्यावर आम्ही तेथे छापा टाकला असता नितीन संभाजी चव्हाण रा.गुळसडी हा कल्याण नावाचा मटक्यासाठी आकड्यावर पैसे घेताना आढळून आला. त्याच्याकडून १०५० रू. रोख, एक निळ्याशाईचा बॉलपेन, पांढऱ्या रंगाची स्लीप बूक जप्त केली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

पाथुर्डी येथे विहिरीवरील पंपाची चोरी

करमाळा (सं.प्र.): पाथुर्डी येथे विहिरीत पाणी काढण्यासाठी सोडलेली पाच एचपीची पाणबुडी मोटार तसेच स्टार्टर व सर्व्हीस केबल असा एकूण २६ हजार रूपयाचा ऐवज चोरट्यांनी चोरून नेला आहे. या प्रकरणी सुनील अंकुश कोरे (रा.पाथुर्डी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की १७ जानेवारीला सायंकाळी सात वाजता शेतातून घरी आलो त्यावेळी पाणबुडी मोटार, स्टार्टर व सर्व्हीस केबल होती. १९ जानेवारीला शेतात गेलो असता या वस्तू चोरट्यांनी चोरून नेल्या आहेत. पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

कविटगाव येथे चौघाकडून तिघांना मारहाण

करमाळा(सं.प्र.) : शेत वहिवाटू नको असे म्हणून चौघा जणांनी तिघा जणांना दगडाने बेदम मारहाण केली आहे. हा प्रकार १९ जानेवारीला दुपारी एक वाजता कविटगाव येथे घडला आहे. या प्रकरणी कावेरी सुरेश जगताप यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की १९ जानेवारीला दुपारी एक वाजता आम्ही आमच्या शेतात काम करत असताना शेजारील शेतकरी शहाजी सुर्यभान शिंदे, यशवंत सुर्यभान शिंदे, प्रशांत यशवंत शिंदे, बिटाबाई बाळू फरतडे याने विहिरीतील खरपणाच्या दगडाने मला तसेच माझा मुलगा योगेश व पती सुरेश जगताप यांना मारहाण करून जखमी केले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विनायक माहूरकर हे करत आहेत. यात यशवंत सुर्यभान शिंदे यांनी सुरेश भैरू जगताप, कावेरी सुरेश जगताप व योगेश सुरेश जगताप यांच्या विरूध्द फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की आमच्या जमिनीच्या बांधावरून त्यांना समजावून सांगत असताना कावेरी जगताप हिने ऊस तोडण्याच्या कोयत्याने सुरेश जगताप याने विळ्याने तर योगेश जगताप याने दगडाने मारून मला जखमी केले आहे. या प्रकरणी पोलीसांनी क्रॉस गुन्हा दाखल करून त्याचाही तपास विनायक माहूरकर हे करत आहेत.

लव्हे येथे दोघांना बेदम मारहाण

करमाळा(सं.प्र.) : आमच्या हद्दीत ऊसाची ट्रॉली का लावली या कारणावरून दोघा जणांनी दोघांना बेदम मारहाण केली आहे. या प्रकरणी अजय ज्योतीराम खबाले (रा.लव्हे) यांनी फिर्यादीत म्हटले आहे, की आमच्या शेतीत ऊस तोडण्याचे काम चालू असताना मी ऊसाचे वाडे गोळा करीत असताना आजिनाथ धनंजय खबाले व त्याची आई लक्ष्मी धनंजय खबाले हे आले व आमच्या हद्दीत ऊसाची ट्रॉली कोणाला विचारून लावली असे म्हणून आजिनाथ याने पडलेला दगड उचलून माझ्या डोक्यात मारून मला दोघांनी लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. अक्षय माझा भाऊ मला सोडण्यास आला असता, त्यालाही या दोघांनी मारहाण केली आहे. पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

मुकबधीर शाळेत शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप

करमाळा(सं.प्र.) : टायगर ग्रुपचे अध्यक्ष डॉ.तानाजी जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली टायगर ग्रुप भोसे चे सागर बापू पवार यांच्या वाढदिवसानिमित्त श्रीदेवीचामाळ येथील कमलाभवानी मुकबधीर शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. यावेळी कुशल जैन, सुजित पवार, योगेश गायकवाड, समाधान भोसले, विजय पवार, करण आलाट, मोनू लोखंडे, राजेंद्र सुर्यवंशी, रोहित ढेरे, उमेश वारे, कौस्तुभ भालेराव व टायगर ग्रुपचे सदस्य उपस्थित होते. यावेळी कुशल जैन यांनी टायगर ग्रुपच्या माध्यमातून राबविले जाणाऱ्या सामाजिक उपक्रमाची माहिती दिली.

घरात घुसून चोरट्याने पावणेदोन लाखाची केली चोरी

करमाळा (सं.प्र.) : घरात घुसून सोन्याचे दागिणे, रोख रक्कम, मोबाईल असा पावणेदोन लाख रूपयाचा ऐवज चोरट्याने चोरून नेला आहे. हा प्रकार २५ जानेवारीच्या मध्यरात्री पोमलवाडी येथे धनाजी पाटील यांचे वस्तीवरती घडला आहे. या प्रकरणी धनाजी आप्पासाहेब पाटील (रा.पोमलवाडी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे,की २५ जानेवारीला आम्ही जेवण करून घरातील सर्वजण झोपलो असता मध्यरात्री चोरट्यांनी घरात घुसून सुटकेस बाहेर नेऊन त्यातील दीड लाख रूपये किंमतीचे सोन्याचे गंठन तसेच अडीच हजार रूपये रोख, २३ हजाराचे तीन मोबाईल असा साधारणत: पावणेदोन लाख रूपयाचा ऐवज चोरट्याने चोरून नेला आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पीएसआय प्रविण साने हे करत आहेत.

ऊसतोड मजुरास नेले पळवून - पोलीसात गुन्हा दाखल

करमाळा (सं.प्र.ञ) : ऊसतोड मजुरास कारगाडी मधून पळवून नेले आहे. हा प्रकार २५ जानेवारीला रात्री आठ वाजता जेऊर येथे घडला आहे. या प्रकरणी अश्विनी अमोल खंदारे (रा.जवळा, ता.दारवार, जि.यवतमाळ. सध्या कांडेकर वस्ती, जेऊर) या महिलेने फिर्याद दिली आहे. माझे पती अमोल मधुकर खंदारे (वय-३०) हे बाजार करण्यासाठी २५ जानेवारीला रात्री आठ वाजता गेले असता. चिखलठाण चौकातून लाल रंगाच्या चारचाकी गाडीमध्ये तिघाजणांनी त्यांना टाकून पळवून नेले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

अबॅकस परीक्षेत यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा आण्णासाहेब जगताप विद्यालयात सत्कार

करमाळा (सं.प्र.) : करमाळ्याचे नांव आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवणारी अकॅडमी म्हणजे मुथा ॲकडमी. याच अकॅडमीचे व आण्णासाहेब जगताप विद्यालयातील विद्यार्थी सार्थक मकरंद वनारसे, आदित्य सुहास कापसे, गौरी अनिल राणे व करण गौतम करळे या चारही विद्यार्थ्यांनी पुणे येथे झालेल्या ॲरिस्टो किडस् आयोजित राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस व वैदिक मॅथस् परीक्षेत प्राविण्य मिळवून त्यांची दिल्ली येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली. या सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार आण्णासाहेब जगताप विद्यालयाचे मुख्याध्यापक कांबळे सर व अभयशेठ सोळंकी यांचे हस्ते ट्रॉफी व सन्मान चिन्ह देऊन करण्यात आला. यावेळी सर्व शिक्षक स्टाफ व पालक उपस्थित होते. या विद्यार्थ्यांना मुथा अबॅकस अकॅडमीच्या संचालिका ज्योती मुथा व पल्लवी भिंगारे यांचे मौलिक मार्गदर्शन लाभले.

प्रजासत्ताक दिनी जेऊर येथील भारत हायस्कुल मधील मल्लखांब खेळाडूंनी चित्तथरारक कसरती सादर केल्या. या खेळाडूंना पी.एस.वाघमारे व बी.एस.शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

जिनके इरादे बुलंद हो.. वो सडकोंकी नही आसमानो की बाते करते है ।

वयाच्या त्र्याऐंशीतही व्यापारात सक्रिय

असं म्हटलं जातं.. "आप अपना भविष्य नही बदल सकते । पर आप अपनी आदते बदल सकते है और निश्चित रूपसे आप की आदते भविष्य बदल देगी ॥" अशाचप्रकारे करमाळा येथील व्यापारी कांतीलाल पनालाल कटारिया यांनी मेहनत आणि सच्चाई या जोरावर करमाळा शहरात गेल्या ६० वर्षापासून व्यापार करत आपला परिवार आणि आपलं संपूर्ण भविष्य बदलवून टाकलं आहे. १९५३-५४ ला लोकाच्या जागेत व भागीदारीत व्यवसाय करणाऱ्या कटारिया परिवाराची करमाळा शहरात कापड, होजिअरी, भांडी, मेडिकल अशी चार दुकाने असून भरपेठेत ग्राहकांचे लक्ष वेधतील; अशी अत्याधुनिक आहेत. एवढं उभं केल्यानंतरही ही व्यक्ती निवांत बसत नाहीतर वयाच्या ८३ व्या वर्षीही कापड दुकानात ग्राहकांना कापड दाखविण्यात व्यस्त असतात आणि त्यातूनच ते स्वस्थ आणि मस्त राहत आहेत.

अलिकडे पन्नाशी ओलांडली की अनेकजण स्वेच्छा निवृत्तीचा विचार करतात. वयाच्या साठीनंतर घर आणि व्यवसाय यातून अनेकजण निवृत्त होतात. अशा काळात अनेकांना दिशादर्शक व प्रेरणादायी काम शेठ कांतीलाल कटारिया हे करत आहेत.

१४ ऑगस्ट १९४० चा कांतीलाल कटारिया यांचा जन्म झाला. वडीलांचा कापड व्यवसाय असलातरी जेमतेम होता. बाजारात जाऊन कापड विकणे आणि मिळेल त्या पैशावर दैनंदिन खर्च करणे अशी स्थिती होती. ना दुकानला जागा ना दुकानसाठी भांडवल. ना नातेवाईकांची साथ. अशावेळी घरातील अतिशय प्रतिकुल परिस्थिती पाहून सातवीचे शिक्षण झाले आणि १९५३ पासून कटारिया यांनी व्यवसायात उतरायचे ठरवले. त्यावेळी हाताशी कोणतेही भांडवल नसल्याने त्यांनी भागीदारीत व्यवसाय केला. थोडेफार उत्पन्न मिळू लागले, पण चांगले दिवस येताच भागीदारांनी हात झटकले. दरम्यान छोटे बंधू चंद्रकांत यांनीही आपले शिक्षण सोडून रॉकेल विक्रेत्याकडे काम सुरू केले. भागीदाराने फसविल्यानंतर करायचं काय ? हा मोठा प्रश्न पडला होता. पण कटारिया यांनी काही ना काही करायचं, असं ठरवून रोज नवा पर्याय शोधायचे काम सुरू झाले. दरम्यान डॉ.आर.एम.शहा यांनी ही त्यांची अडचण ओळखली आणि सुरूवातीला एक जागा भाड्याने मिळवून दिली. त्यानंतर व्यवसाय सुरू झाला, पण फारसे भांडवल नव्हते. आहे त्या भांडवलातच ग्राहक करायचे आणि येईल त्या पैशातून माल आणायचा आणि त्यातूनच परिवार चालवायचा. त्यात बंधू चंद्रकांत यांचे लग्न जमले. लग्नासाठी दोन हजार रूपयाची गरज होती. ज्या मालकाकडे चंद्रकांत काम करत होते, त्यांनी मात्र मदत केली नाही. त्यावेळी पैसे मिळणे खूप दुरापास्त झाले. परंतू त्यांचे मित्र असलेले अजय प्रेसचे मालक षडाक्षरी स्वामी यांनी त्यावेळी त्यांना मदत केली. कटारिया यांचे मित्र हरिश्चंद्र लुणिया, कै.पोपटशेठ गुगळे, कै.बबनराव क्षीरसागर, कै.षडाक्षरी स्वामी, कै.सुवालाल गुगळे, कै.पोपटशेठ कटारिया या मित्र परिवाराची त्यांना कायम साथ मिळाली.

मालकांनी लग्नाला पैसे दिले नाही म्हटल्यावर चंद्रकांत कटारिया यांनी काम सोडले. पण दुसरा पर्याय काय ? त्यावेळी चिवटेंची जागा भाड्याने मिळाली, पण त्याला वर टाकायला नव्हते पत्रे आणि व्यापाराला नव्हते पैसे. त्यावेळी पुन्हा एकदा डॉ.आर.एम.शहा यांनी स्वत: बोलावून मदत केली. त्यानंतर मे.पनालाल बिसनदास कटारिया कापड दुकान व त्यानंतर दिपक ड्रेसेस हे दुकान सुरू झाले.

पुढे दोन दुकानाच्या माध्यमातून प्रगती होत गेली. शहरात इंचभर जागा नव्हती, अशा स्थितीत सर्वांच्या सहकार्याने मेनरोडवरती जवळपास पाच ठिकाणी लाखो रूपये किंमतीच्या जागा मिळाल्या. त्यातून वेगवेगळे व्यवसाय सुरू झाले. याच कालावधीत चार बहिणींची लग्ने तसेच इतर नातेवाईकांचे प्रश्न आणि परिवाराची प्रगती अशी तिहेरी जबाबदारी पार पाडत सरळ मार्गाने कांतीलाल कटारिया आणि चंद्रकांत कटारिया यांनी आपली व्यवसायिक प्रगती केली. त्यांचे तिसरे बंधू अशोक (प्रकाश) कटारिया सर हे पुणे येथे कॅम्प एज्युकेशन सोसायटी येथे उपमुख्याध्यापक पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत. तिघाही भावांचा एकमेकांवर असलेला विश्वास आणि जीवाला जीव देण्याची भुमिका यामुळे आमची प्रगती झाली असे कांतीलाल कटारिया यांनी सांगितले आहे. एवढेच नाहीतर आम्हाला इतर जागा मिळाल्यानंतर चिवटेंची जागा स्वत:हून विनामोबदला चिवटे यांच्या ताब्यात दिली. सध्या असलेले फर्म वर्धमान क्लॉथ सेंटर, वर्धमान गारमेंटस्, वर्धमान मेटल, वर्धमान मेडिकल अशी चार दुकाने आहेत.

वयाच्या १४ व्या वर्षापासून मला व्यवसायात पडावे लागले. घरात मोठा असल्याने सर्वांची जबाबदारी माझ्यावर होती. चंद्रकांत हा माझ्यापेक्षा लहान भाऊ असलातरी तो आयुष्यभर मित्रासारखा माझ्यासोबत राहिला. आम्हा दोघा भावांची राम-लक्ष्मणाची जोडी म्हणून सर्वात ओळख आहे. तर माझा धाकटा भाऊ अशोक (प्रकाश) कटारिया सर यास भरत म्हणून ओळखतात. प्रतिकुल परिस्थितीतून वाटचाल करताना आम्हाला कै.आण्णासाहेब जगताप, कै.डॉ.आर.एम. शहा कै.गिरधरदास देवी आदी मंडळींचे सहकार्य लाभले. स्वातंत्र्यसैनिक अंबालाल चंद्रभान सोनी यांच्याबरोबर एका जागेचा सौदा झाला, त्यावेळी त्यांनी ती जागा इतरापेक्षा मला स्वस्त दिली. त्यानंतर अनेकांनी त्या जागेची किंमत दीडपटीने वाढवली, परंतू कै.सोनी यांनी पैशापेक्षा शब्दाला महत्व दिले. अशी माणसं होती म्हणून प्रगती झाली. माझ्या वाटचालीत हरिश्चंद्र लुणिया (मलठणकर), कै.षडाक्षरी स्वामी, कै.पोपटशेठ गुगळे, कै.डॉ.आर.एम. शहा, कै.सुवालाल गुगळे या मित्रांचे योगदान लाभले. माझ्या जीवनात तीन वेळा पैसे नाहीत म्हणून आत्महत्या करण्याचे प्रसंग आले, परंतू परमेश्वराने त्या-त्यावेळी परीक्षा पाहून मदत केली म्हणून मी आज उभा आहे.

परिवार...

कांतीलालशेठ यांना चंद्रकांत, अशोक (प्रकाश) असे दोन बंधू असून, चार बहिणी होत्या. त्यापैकी दोन बहिणी हयात आहेत. दिपकशेठ व मनोजशेठ हे दोन सुपुत्र व एक मुलगी सौ.सुनिता महेंद्र मुनोत(दौंड) असे तीन अपत्य आहेत. दिपकशेठ हे भांडी व्यवसाय तर मनोजशेठ हे कापड व्यवसायात कार्यरत आहेत. कांतीलालशेठ यांच्या सुविद्य पत्नी सौ.शशिकला यांचे २०१० साली निधन झाले. सौ.लता, सौ.हर्षा या सुना असून नातसुन सौ.श्रध्दा तसेच नातू स्नेहल, साहिल (विकी) (बी.इ.), संकेत (सिव्हील इंजि) हे आहेत. तसेच कांतीलाल यांची नातू स्नेहल यांची मुलगी निहारिकासह दोन पणती आहेत. मनोजशेठ यांना मुलगा ऋतिक व मुलगी मनाली (कंपनी सेक्रेटरी सी.एस.) आहे.

धाकटे बंधू चंद्रकांत कटारिया हे वर्धमान जैन श्रावक संघाचे अध्यक्ष होते. त्यांच्या पत्नी सौ.ज्योत्स्ना या घर सांभाळतात. त्यांना संतोष व निलेश हे दोन सुपुत्र असून संतोष (पिंटू) यांनी रेडिमेड कापड व्यवसायात कार्यरत राहत न.पा.शिक्षण समितीच्या सभापती पदावरही काम केले आहे. निलेश हे मेडिकल व्यवसायात कार्यरत आहेत. सौ.ज्योत्स्ना संतोष, सौ.प्रिती निलेश या दोन सुना आहेत. दोन मुली सौ.शैला विजय चुत्तर (राहूरी) व सौ.स्वाती सुनील गांधी (अहमदनगर) हे आपल्या सासरी सुखी जीवन जगतात. संतोष यांना शुभम व सौ.सायली ईशान गांधी (केडगाव स्टेशन) व निलेश यांना आयुष व श्रृती ही अपत्ये आहेत.

तिसरे धाकटे बंधू अशोक (प्रकाश) सर हे पुणे येथे राहतात. त्यांना अमित (मॅनेजर, फार्मासुटिकल कंपनी मुंबई) व अतुल (मास्टर आर्किटेक्चर) हे दोन मुले असून एक मुलगी सौ.अर्चना आनंद मुथा(अहमदनगर) ही सासरी सुखी जीवन जगत आहे. तसेच सुना सौ.श्रध्दा अमित व सौ.प्रियंका अतुल (मास्टर आर्किटेक्चर) या आहेत तर कु.निष्का, दर्शिका व मनवा या तीन नाती आहेत. सौ.पुष्पा या गृहिणी पुणे येथे घरसंसार सांभाळत आहेत.

आठवण...

दादा.. तुम्ही असताना
घरात चैतन्य फुलायचं
प्रत्येक मन खुलायचं
आनंदानं बोलायचं
आता तो आनंद नाही
मायेचा ओलावा नाही ॥१॥
दादा.. तुम्ही असताना
स्फुर्तीची पर्वणी होती
ज्ञानरूपी शिकवण होती
शिस्तीची शाळा होती
आता तो आधार नाही
विसाव्याला ठिकाण नाही ॥२॥
दादा.. तुमचा सहवास
तिर्थक्षेत्राचा भक्तीभाव होता
गजबजलेला गाव होता
आपुलकीचा ठाव होता
आता तो ओलावा नाही
आत्मियतेचा शब्द नाही ॥३॥
दादा.. तुमचं असणं
घर कसं साधायचं
मन घराकडे ओढायचे
तुम्ही जणू वटवृक्षाची सावली
अन् माझी तर विठूमाऊलीच होती
आम्हा सर्वांचे त्रिवार वंदन..
त्रिवार वंदन ॥४॥

..सौ.मंजिरी अविनाश जोशी
किल्ला विभाग, करमाळा. मो.९६८९६९०७१५

पै.भोगे यांचा पाटील गटात प्रवेश

करमाळा(सं.प.) : आ.संजयमामा शिंदे गटाला सोडचिठ्ठी देत अर्जुननगर येथील युवा नेते पै.जयसिंग भोगे, बाळासाहेब भोगे यांनी माजी आमदार नारायण पाटील गटात प्रवेश केला. युवा नेते पै.पृथ्वीराज पाटील यांचे हस्ते भोगे यांचा सत्कार करून पाटील गटात स्वागत केले. यावेळी मा.सरपंच अनिल थोरात, बिनू शिंदे, नटराज भोगे, दादा थोरात, मुकेश पाटूळे उपस्थित होते.

रेडि पझेशन मध्ये
बुकिंग सुरु

श्री डेव्हलपर्स

- अणणासाहेब विद्यालय ५ मी.अंतरावर
- नवीन भाजी मंडई १० मी.अंतरावर

- उपलब्ध सुविधा -

- 2BHK रो- बंगलोज
- डबल मास्टर बेडरुम
- स्वतंत्र प्रशस्त पार्किंग
- स्वतंत्र काँक्रिट जिने
- इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग पॉइंट
- वास्तुशास्त्राप्रमाणे बांधकाम
- आर. सी. सी. इमारत
- सर्व ब्रॅन्डेड अमेनिटीज्सह दर्जेदार बांधकाम
- स्वतंत्र व प्रशस्त पार्कींग व २४ तास पाणी
- कंन्सील्ड ईलेक्ट्रीक फिटींग
- डबलचार्ज टाईल्स व ग्रेनाईट
- लाफ्ट इन किचन ॲण्ड बेडरुम
- पावडर कोटेड ॲल्युमिनीयम ३ ट्रॅक स्लाईडिंग विंडो

बॅंक लोन सुविधा उपलब्ध
HOME LOAN

* त्वरित संपर्क करा : 8459392545

पत्ता - प्लॉट नं. २०, अणणासाहेब विद्यालय शेजारी,(बालाजी नगर)
कैं.बाजीराव जाधव नगर, करमाळा जि. सोलापूर

मजबुत.., सुरक्षित.., विश्वसनीय..

RAJURI STEEL UltraTech CEMENT Chettinad cement APLAPOLLO

स्टॉक

- टी.एम.टी. रॉड
- फेनसिंग वायर
- बायडींग वायर
- सिमेंट इ.

अधिकृत विक्रेते :
राजुरी स्टील
अल्ट्राटेक सिमेंट

पत्ता

जयहिंद सेल्स

स्टील & सिमेंट सप्लायर्स

सय्यद कॉम्प्लेक्स, जुना करमाळा-नगर
रोड, करमाळा., जि.सोलापूर

प्रोप्रा : माऊली हिंगसे
मो.9011612403, 7507812720

भावपूर्ण श्रध्दांजली

श्रीमती आनंदमती नेमचंद दोशी
(मृत्यू दि.२६/१/२०२३)

आडत व्यापारी व आनंदी ज्वेलर्सचे मालक **श्री.अशोकशेठ दोशी** व कापड व्यापारी **श्री.राजकुमार दोशी** यांच्या मातोश्री

श्रीमती आनंदमती नेमचंद दोशी

यांचे वृध्दपकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने दोशी कुटूंबियावर दु:खाचा डोंगर कोसळला असून, त्यांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. ईश्वर त्यांचे आत्म्यास चिरशांती देवो; हीच प्रार्थना ! त्यांच्या स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली..!!

शोकाकुल

शौर्य मोटार ड्रायव्हींग स्कुल, करमाळा.
प्रोप्रा : अमित रोडगे